# सादर करीत आहेत, 'बेसमेंट थेटर' निर्मित......

रेवती ओक

नाटक नाटक म्हणजे काय कडक चहावरची दुधाळ साय,
चार बाप्ये दोन बाया, उत्तम स्क्रिप्ट आणि बेसमेंटची छाया,
डिरेक्टरची चतरंगी कमाल, म्यानेजरच्या मानेची फिरती ढाल,
सोशीत सारे नाटकी नखरे, नाटकाच्या तालमींना रंग चढे,
हा हा म्हणता तारीख लागली, नाटकाच्या फडाची ढोलकी रंगली,
सगळा रंग पुरेपूर उतरला, पुन्हा एकदा नाटकाने प्रेक्षक जिंकला॥

चुकला फकीर मशिदीपाशी हया म्हणीप्रमाणे, जून महिना जवळ आला की शिकागो परिसरातल्या हौशी पण दर्दी कलाकारांना वेध लागतात त यंदा नाटक कोण करतं आहे त्याचे आणि नाटक कुठलं आहे हयाचे. हळूहळू नाटकाचे मनसुबे इकडून तिकडून ऐकू यायला लागतात आणि एक दिवस बातमी येते, North चे लोकं हयावर्षी चा नाटक करणार आहेत. South ची मंडळी तालमीला चाळीस माईल्स जायला लागेल म्हणून थोडी नाराज होतात पण नाटकाचं प्रेम अशी गोष्ट आहे कि, "कितने दूर कितने पास" अशी अवस्था आमच्या कलाकारांची होते. आता तुम्ही म्हणाल एक तद्दन मराठी नाटक आणि तेसुध्दा मराठी माती पासून हजारो कोस दूर; कोण करत असेल हा उपद्व्याप आणि कोण बघत असेल हे नाटक? पण तुम्ही चुकता आहात महाराज, हे दुसरं तिसरं कुठलं ठिकाण नाही, तर हे आहे शिकागो आणि ही आहे, आपल्या मराठी बाण्याची मुहूर्तमेढ करुन महाराष्ट्रापासून मैलोन्‌मैल दूर राहून ३५–४० वर्ष सातत्याने मराठी रंगदेवतेची सेवा करणाऱ्या शिकागोच्या नाटकाची गोष्ट! तसं शिकागोला नाटक काही नवीन नाही, जवळ जवळ ३५ वर्षाची परंपरा आहे. अनेक जुने आणि जाणते कलाकार शिकागोने पाहिले आहेत आणि आता नवीन पिढी एक पाऊल पुढे टाकून रंगकर्मींना एकत्र आणून काही उपक्रम करायचा विचार करत आहे, त्यातील पहिले पाऊल म्हणजे 'बेसमेंट थेटर'. तुम्ही शाळेत, कॉलेजात नाटकात काम केलं होतत का कधी? नाही? काही हरकत नाही. आम्ही नवकलाकारांना अभिनय शिकवतो, म्हणजे आमच्या बेसमेंट थेटर हया उपक्रमात हौशी, थेटरची आवड असलेल्या रसिकांना नाटकात काम करायची संधी मिळायला लागली. २००७ साली काही नाटक प्रेमी शिकागोकरांना 'बेसमेंट थेटर' ची कल्पना सुचली आणि बघता बघता हा उपक्रम २ वर्षांचा झाला. हया दोन वर्षात माझ्यासारख्या अनेकांना आपले सुप्त गुण व्यक्त करायला एक व्यासपीठ मिळालं आणि सृजनाचे वारे शिकागोत वाहू लागले, उगाच नाही windy city म्हणत.

दर महिन्याच्या शेवटच्या शनिवारी आमचा हा सृजनमेळा एका बेसमेंट मध्ये भरतो आणि काव्य वाचन, नाटय वाचन, अभिनय, चित्रकला, नृत्य अशा सर्व उपयोजित कला माध्यमांची चर्चा व सादरीकरण येथे होते. हे तुम्हाला थोडं आपल्या कट्टयासारखं नाही का वाटत? खरा आहे हा कट्टाच आहे; कलास्वादाचा, अभिरुचीचा......चार जणांनी एकत्र येऊन काहीतरी साध्य करण्याचा. ह्यात कुठलीही स्पर्धा नाही कि कोणाची नक्कल नाही, एक परिपूर्ण असा कलाविष्कार देण्याचा प्रयत्न आम्ही सारेजण करत असतो. २००७ साली "आज अचानक" हया शिर्षकाखाली नाटयवाचन, काव्यवाचन, कथाकथन आणि नाटयप्रवेश असा एक संपूर्ण कार्यक्रम सादर करुन बेसमेंटतर्फे नक्कीच दर्जेदार प्रयोग रसिकांच्या समोर येतील हयाची खात्रीच झाली. ह्याच माध्यमातून आत्तापर्यंत ३ एकांकिका (मराठीने केला मद्राशी भ्रतार, चंपा गोवेकर, खेरीज) आणि २ अंकी नाटक 'करायला गेलो एक' रसिकांच्या समोर सादर केल्या. आणि हयातील 'मद्राशी भ्रतार' नुसता शिकागोतच नाही पसंत पडला, तर थेट AtEnta सुध्दा भावला. हयातल्या माझ्या स्वतःच्या आठवणीतला अनुभव दोन नाटकांचा 'मराठीने केला मद्राशी भ्रतार' आणि 'करायला गेलो एक'. दोन्हीत माझी भूमिका कजाग बाईची असल्याने मला फार काही भूमिकेत शिरायला लागणार नाही असं आमच्या हयांचं मत होतं! भ्रतारच्या वेळेला मला जरा वैयक्तिक exit घ्यावी लागली, पण आमच्या ग्रुपने हुरुप सोडून न देता तालीम सुरु ठेवली होती आणि माझ्या भूमिकेसाठी माझ्यापेक्षाही उत्तम कलाकार मिळाली. अशा अटीतटीच्या वेळी 'बेसमेंट थेटर' सारखं माध्यम असल्यामुळे वेळ निभावून नेता येते कारण नाटकाची तारीख लागलेली असते, सगळे मराठी रसिक दिवाळीच्या नाटकाची वर्षभर वाट पहात असतात आणि अशावेळी मला जसा प्रश्न उद्भवला तसा इतरही कलाकारांना येऊ शकतो, परंतु हया 'बेसमेंट थेटर' मुळे आता नवनविन चेहेरे सतत समोर असतात त्यामुळे पर्याय लगेच शोधता येतो. नुसतेच अभिनेते, अभिनेत्री न घडवता दिग्दर्शन, नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत हयातही आमच्या मंडळींनी बाजी मारली आहे. 'करायला गेलो एक' हया दोन अंकी नाटकाचे शीर्षकगीत, संगीत आणि animated titles हे सर्व काही 'बेसमेंट थेटर' चीच निर्मिती आहे. हयाच्याच जोडीला "बेसमेंट थेटर" ला आणखी एक मान मिळाला आहे, तो म्हणजे, न्यू जर्सी येथे २०१० साली भरणाऱ्या पहिल्या वहिल्या "विश्वनाटयसंमेलनात" दोन अंकी नाटक "बूमरँग" सादर करण्यासाठी आमंत्रण मिळालं आहे. आगामी उपक्रमात येत्या मार्चमध्ये स्थानिक कलाकारांनी लिहिलेल्या कविता आणि गाणी यांना येथीलच संगीतकारांनी चाली लावून त्याचा कार्यक्रम करण्याचा मानस आहे.